# राशिभविष्य - जून, २०१२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==============================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या पूर्वार्धात मनस्ताप देणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. तरीही आप्तेष्टांत गैरसमज, भांडणे होण्याची शक्यता दिसते. आर्थिक लाभ होतील; पण फ़सवणुकीचा त्रास होणेही संभवते. या राशीच्या काही मंडळीना आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याबाबत चिंता उत्पन्न होण्याची शक्यता आहे. तसेच मुलांच्या आचरणविषयक समस्या, अनारोग्य अशापैकी कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. वैद्यकीय शाखेचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषध विक्रेत्यांना,वैद्यक शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच खाण उद्योग व कोळसा व्यापारी, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारे, शासकीय,निम-शासकीय नोकरदार मंडळी अशा सर्वांना महिन्याचा उत्तरार्ध लाभदायक होईल. . या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल तापदायक ठरेल. म्हणून हृदयविकार असणारांनी अति विचार करू नये व मन शांत ठेवावे

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-बुध-मंगळ हे तीन ग्रह प्रतिकुल असून गुरु-शुक्र अनुकुल आहेत. त्यामुळे विविध कारणांनी मनस्ताप सहन करावा लागून शारीरिक-मानसिक अनारोग्य बळावण्याची शक्यता आहे. पण शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे परिस्थिती अटोक्यात राहील. गैरसमज, अनिष्ट घटना, राहत्या जागेबाबत समस्या, स्थावरसंबंधी वाद अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. तसेच मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काहीही कारणाने मित्रसंबंधात शत्रुत्व येण्याची शक्यता दिसते. महिन्याचे अखेरचे दहा दिवस यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय शास्त्रीय संशोधन व्यवसाय असणाराना प्रगतिकारक, व लाभदायक होतील. इतर नोकरी-व्यवसाय असणारांना अस्थिर परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे दांपत्यजीवनातील सुखसमाधानात विविध कारणांनी बाधा येणे शक्य आहे. जपा.

**(३) मिथुन** - या राशीच्या मंडळीनी या महिन्याचाच काळ फ़ारसा अनुकुल नाही हे ध्यानात घेऊनच मनावर संयम राखून व सहनशील बनून आचरण केले तरच शारीरिक-मानसिक आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही व हातून विपरीत असे काही घडणार नाही. ज्यांना अध्यात्मात रस आहे, त्यांना आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती व सुखस लाभेल. सामाजिक कार्याची आवड असणारांना काळ प्रगतिकारक होईल. विविध कारणांनी कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य लाभणे कठिण असले तरी शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे दिलासा मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात मन खंबीर राहील, आत्मविश्वास वाढेल; पण उत्तरार्धात असह्य मनस्तापामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. त्यामुळेच शारीरिक-मानसिक अनारोग्य बळावण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळींना परधर्मीय ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, उच्च बौद्धिक व्यवसाय व शास्त्रीय

संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यता दिसते.

**(४) कर्क -** महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींना उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. काही मंडळींना आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी खूप कष्ट-परिश्रम करावे लागतील व त्यामुळे अनारोग्य होईल. पण या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणारांपैकी काहीना अर्थलाभ, मानाचे स्थान, बढती अशापैकी लाभ होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात धैर्य-हिंमत वाढेल व यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, शास्त्रीय संशोधन कार्य, दलाली वा कमिशनवर काम करत असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. मात्र शक्यतो जलप्रवास टाळा. धोका संभवतो. पण राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व संततिसुखात थोडी बाधा येणे शक्य आहे. असे असले तरी गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे कटुंबात मनोनुकुल घटना घडतील व अशा बाधेचा फ़ारसा त्रास होणार नाही. शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी मनस्ताप, अनारोग्य अशा कारणांनी अध्ययनात बाधा येणे संभवते. . या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरण्याची शक्यता आहे.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींचा मूळ स्वभाव अत्यंत मानी, हटवादी, हेकट असा आहे. त्यात या महिन्यात संतापी मंगळाची भर पडणार आहे. सबब अपेक्षापूर्तीसाठी कठोर परिश्रम करावे लागतील व खूप दगदग सहन करावी लागेल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत आर्थिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण येणे असलेले धन मिळण्यात अडचणी, घोटाळे निर्माण होतीलसे दिसते. राहूमुळे कौटुंबिक जीवनातील सुखात गैरसमज, मतभेद अशापैकी कारणानी बाधा येणे संभवते. पतिपत्नीपैकी कोणाचे अनारोग्य वा अन्य कारणाने वैवाहिक जीवनातील आनंदावर विरजण पडण्याची शक्यता वाटते. सतत सावधानतेने आचरण करा, वाहन चालवा. अपघातभय आहेच. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच सिद्ध होईल. या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षेत्र मिळेल. विशेष करून चिकित्सक बौद्धिक, शास्त्रीय संशोधन व शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अधिक प्रगतिकारक व लाभदायक होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ चालू आहे. तेव्हा त्यांनी मन व बुद्धी स्थिर ठेवूनच सतत आचरण करत राहावे, हे उत्तम. त्यामुळे सर्व प्रकारचे आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. सध्या या राशीच्या मंडळींना उगीचच आजारभावना झाली असण्याची शक्यता जाणवते. तसेच काल्पनिक चिंता अस्वस्थ करत असतील. अशामुळेच व्यवहारात फ़सवणूक होणे संभवते. जपा. सध्या शनि-मंगळ हे दोन्ही दादा ग्रह प्रतिकुल असून सतत मनाविरुद्ध घटना घडतील व मनाची ओढाताण होईल. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जातील व त्यांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. जपा. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत शनि-मंगळ याच राशीत एकत्र येणार आहेत. ते दहा दिवस शरीरपीडा, श्रम, दगदग सहन करावी लागेल. बुद्धी विकृत होणे संभवते. जपा. राहूमुळे भावंडसुखात काहीही कारणाने बाधा येऊ शकेल. पण

लाभस्थानात येणाऱ्या बुधामुळे थोडे सुखसमाधान मिळू शकेल. हर्षलमुळे जीवनसाथीचे आचरण लहरी व विक्षिप्त होईलसे दिसते. तसेच दांपत्यजीवनात मतभेद, गैरसमज, भांडणे होतील व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा.  या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदाराशी संशयाचे वातवरण निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.  महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणारांना व विद्यार्थ्यांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील व संपन्न होतील.

**(७) तूळा** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि, शनि पूर्णपणे प्रतिकुल असणार असून मंगळ व बुध उत्तरार्धात प्रतिकुल होणार आहेत. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय हळवे व भावनाप्रधान झाले असण्याची शक्यता आहे. त्यात सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. सबब काळ फ़ारसा अनुकुल नाही ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून सावधानतेने, विचारपूर्वक आचरण होणे जरूरीचे होईल. काही मंडळींना मुदतीच्या तापाचे आजाराला तोंड द्यावे लागेल, तर काहींना असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्यामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते.  दिनांक २१ रोजी मंगळ या राशीच्या व्ययस्थानी आल्यावर तर अधिकच मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा.  पण अध्यात्म, गूढ संशोधन, उच्च बौद्धिक शास्त्रीय संशोधन  क्षेत्रात  कार्यरत  असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. कौटुंबिक आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी अपार कष्ट-परिश्रम करावे लागतील. काहीही कारणाने मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. मन अस्वस्थ व चंचल असल्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना मनापासून अध्ययन करणे अशक्य होईल.  गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ तर काहींना भूमिलाभ होणे संभवते.  काही मंडळीचा मनसन्मान होणेही शक्य आहे.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या सर्व प्रकारच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक होईल. काही मंडळीना वातविकार, रक्तविकार, पोटविकार, अपचन अशापैकी एखाद्या आजाराला तोंड द्यावे लागेल. कौटुंबिक व वैवाहिक जीवनामध्येही काहीही कारणाने वाद, गैरसमज होऊन सुखासमाधानात थोडी बाधा येणे संभवते. जपा. मुलांपैकी कोणाच्या गंभीर आजारामुळे वा आचरणविषयक समस्येमुळे अपेक्षित संततिसुखातही बाधा येणे शक्य आहे. तसेच काहीही कारणाने मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. जपा. त्यामुळे काही मंडळीना नैराश्य येऊन वैराग्यावस्था प्राप्त होईल. असे असले तरी या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. वकिली-सल्लागरी व्यवसाय, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लगेलसे दिसते, तसेच या राशीच्या युवकयुवतींना काही नावीन कार्यक्षेत्रात पदार्पण करण्याची तीव्र इच्छा निर्माण होईल. तसेच महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आहे हे लक्षात घेऊन सतत सावधानतेने व विचारपूर्वक आचरण करणेच सुखावह होईल.

**(९) धनु** - सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय भावनाप्रधान झाले असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काही घडले तरी त्यामुळे अस्वस्थता वाटते सुखसमाधान लाभत नाही. पण

अध्यात्मात विशेष रुचि असणारांना व गूढ तत्त्वांची उकल करण्याचा छंद असणारांना काळ सात्विक सुखशांतीचा लाभ देणारा असाच असल्याचा अनुभव येईल. काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशवारीचे योग येण्याची शक्यता आहे. हर्षलमुळे काही मंडळींचे कोणाशीही पटणार नाही व सतत तक्रारी करण्याची वृत्ती निर्माण होईल. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही व त्यामुळे गृहसौख्यातही बाधा येणे शक्य आहे. जपा. . महिन्याचा पूर्वार्ध शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना अनुकुल व लाभदायक होईल; तर महिन्याच्या उत्तरार्ध यांत्रिकतांत्रिक
नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धातच या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील पण प्रवासात त्रास होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना अपचन, पोटविकार, मूत्राशयविकार अशापैकी एखाद्याआजाराशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. जपा. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा.

**(१०) मकर** - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पूर्वार्धात रवि-मंगळ हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार असल्यामुळे ते आरोग्यविघातक होणार आहेत. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्यास तोंड द्यावे लागेल. काही मंडळीना मूळव्याधीसारख्या उष्णताविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. काही मंडळीना अपार शारीरिक-मानसिक क्लेश व कष्ट सहन करावे लागतील. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. अपघात भय असल्याने या राशीच्या सर्वांनीच सावधानतेने आचरण करावे. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत परिस्थिती सुधारेल व खूपच सुखसमाधान लाभेल. प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात त्रास व मानहानी होण्याची शक्यता जाणवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक् प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण या राशीच्या मंडळीना संततिविषयक समस्येमुळे अपेक्षित संततिसुख मिळेलच असे सांगता येत नाही. या राशीच्या शासकीय नोकरीत असलेल्या ज्या मंडळीना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. तसेच जुगाराचा नादही सोडावा. नुकसानच संभवते. उच्च बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, यशदायक असल्याचा अनुभव येईल. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील. प्रेमसंबंध वाढतील.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अतिशय हळवे, चंचल, अस्थिर असे झाले असावे, असे वाटते. पण वाचा स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव मात्र थोडा विक्षिप्त होऊन हातून अविचाराने खर्च होण्याची शक्यता आहे. जपा. तसेच विचित्र आचरण होणेही संभवते. जपा. जिभेला लगाम घालून इतरेजानांशी आचरण केलेत तर माणसे दुखावली जाणार नाहीत. व मैत्रीच्या संबंधात बाधा येणार नाही. या राशीच्या मंडळीनी सर्व प्रकारच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. उष्णताविकार व वातविकारांचा त्रास होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत अनारोग्य वाढण्याची अधिक शक्यता आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर काळ अनुकुल

नसल्याने ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक सुखसमाधानास गुरुशुक्र अनुकुल असले तरी रवि-केतुमुळे अपेक्षित सुखसमाधान मिळेलच याची खात्री नाही. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील व बागाईत शेती व्यवसाय असणारांना अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. महिन्याचे अखेरचे दहा दिवस बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना लाभदायक होतील.श्रद्धेने हनुमानचालिसा वाचा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अस्वस्थ असावी असे वाटते. त्यात स्वभावही अस्थिर, चंचल, लहरी असा झाला तर स्वत:ला व संबंधिताना असह्य त्रास सहन करावा लागेल. जपा. अहंकाराला लगाम घाला व मनावर संयम ठेवून सहनशील होऊन आचरण करा. त्यामुळे होणारा मनस्ताप खूपच सुसह्य होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, यशदायी व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होऊ शकेल. प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळीना भूमिलाभ, काहीना धनलाभ तर तसेच काहीना मानाचे स्थान प्राप्त होईल. काही कारणाने भावाभावात वितुष्ट येण्य़ाची ्शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळामुळे महिन्याच्या पूर्वार्धात वैद्यकीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना व औषधविक्रेत्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण शारीरिक-मानसिक कष्ट फ़ार होतील व त्यामुळेच शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांच्या आजाराला तोंड द्यावे लागेल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

=====00000=====